गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ
"सिंचन भवन", जालना रोड, औरंगाबाद-431 005
दूरध्वनी क्र.(थेट) (0240) -2342096, कार्यालय 2342097, फॅक्स 2332426
E-mail-edgmidc.abadwrd@maharashtra.gov.in

**माहितीचा अधिकार अधिनियम-2005 अंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जासंदर्भात या कायद्यातील तरतुदीनुसार अर्ज निकालात काढणे बाबत.**

## परिपत्रक

**संदर्भ :** 1) महामंडळ मुख्य कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.जसंक/2819,दि.21/03/2016.
2) महामंडळ मुख्य कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.जसंक/6381,दि.19/07/2016.
3) महामंडळ मुख्य कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.जसंक/388,दि.18/01/2017.
4) महामंडळ मुख्य कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.जसंक/922,दि.06/02/2017.

कृपया संदर्भिय महामंडळ कार्यालयाची परिपत्रके आणि वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियम-2005 संबंधित परिपत्रके आणि राजपत्र यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या कायद्यातील तरतुदींच्या मर्यादेत शासकीय कार्यालयामार्फत अर्जदारास पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे. या करीता खालील सुचनांचे तंतोतंत पालन करावे.

1. (a) शासनामार्फत प्राप्त होणारे माहिती अधिकार अधिनियम-2005 अंतर्गतचे माहिती मिळणे बाबतचे अर्ज, तसेच प्रथम अपिल अर्ज यावर कार्यवाही करताना अर्जदारास करण्यात येणाऱ्या पत्रव्यवहाराची प्रत, माहिती अधिकार शाखा, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद तसेच (शासनामार्फत अर्ज/अपिल प्राप्त झाले असल्यास.) शासनास संबंधित जन माहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांना लक्षवेध करुन देण्यात यावी. अर्जदाराने पोस्टाने माहिती मागितली असल्यास करण्यात येणारा पत्रव्यवहार **पोंच देय डाकेने** करण्यात यावा, आणि पोस्टाकडून प्राप्त पोच पावतीची प्रत संबंधित संचिकेमध्ये जतन करावी.

   (b) एकाच अर्जदाराचे एका पेक्षा अधिक अर्ज असताना नेमक्या अचूक प्रकरणाचा बोध होत नाही. करीता प्रत्येक माहिती अधिकार प्रकरणात शासनाचा, माहिती अधिकार शाखेचा (गो.म.पा.वि.म.,औरंगाबाद) नेमका संदर्भ नमुद करावा.

   (c) अर्जदाराने मागितलेल्या माहितीशी संबंधित कार्यासन प्रमुख तथा सहाय्यक माहिती अधिकारी अंतर्गत पत्रव्यवहाराची प्रत संबंधित अर्जदार, माहिती अधिकार शाखा गो.म.पा.वि.म.,औरंगाबाद, शासन यांना देऊ नये.

2. अर्जदार यांनी मागितलेल्या माहितीच्या उपलब्धते बाबतचा आपल्या कार्यालयाचा अभिप्राय, अर्जदारास उद्देशून- आपल्या कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या पत्रात नमूद करण्यात यावा.

3. आपल्या कार्यालयाची माहिती अर्जदारास पुरविताना, पारदर्शक भूमिकेतून अर्जदारास, 'सदर प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.आणि जन माहिती अधिकारी यांचे पत्र प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांचेकडे अपिल दाखल करु शकता.. असे अर्जदारास कळविणे आवश्यक आहे.

4. अर्जदारास माहिती नाकारताना, नेमक्या कोणत्या माहिती अधिकार अधिनियम-2005 अंतर्गत कलम/नियमाच्या आधारे माहिती नाकारली याचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

5. प्रत्येक महिना अखेर/वर्ष अखेर शासनास माहिती अधिकार अधिनियम-2005 अंतर्गत प्राप्त एकूण अर्ज व अपिल यांचा संख्यात्मक गोषवारा विहित प्रपत्रात सादर करणे क्रमप्राप्त असल्याने विहित कालमर्यादेत माहिती अधिकार प्रकरणाचा निपटारा करण्यात यावा आणि याबाबतची फक्त पत्राची प्रत माहिती अधिकार शाखा, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद या कार्यासनाच्या नेमक्या संदर्भासह या कार्यासनास देण्यात यावी.

6. **कालमर्यादा** : माहिती अधिकार अधिनियम-2005 अंतर्गत कलम 7(1) अनुसार अर्जदारास माहिती पुरविताना कलम 6 अन्वये माहिती मिळण्याची विनंती करणारा अर्ज मिळाल्यावर शक्य तितक्या शीघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून तीस दिवसांच्या आत, एकतर विहित करण्यात येईल अशा फी चे प्रदान केल्यावर, जन माहिती अधिकारी अर्जदारास माहिती देतील.

7. **माहिती अधिकार अधिनियम-2005 अंतर्गत कलम 6(3) अनुसार-**

   जी माहिती अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे असेल, किंवा ज्या माहितीचा विषय अन्य सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजाशी अधिक संबंधित असेल, ..... अशा अर्जाचे हस्तांतरण व्यवहार्य असेल तितक्या लवकर करण्यात येईल. मात्र, कोणत्याही परिस्थितीत ते अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून 5 दिवसांच्यापेक्षा अधिक विलंबाने करण्यात येणार नाही.

महामंडळ कार्यालयातील सर्व माहिती अधिकारी तथा कार्यासन प्रमुख यांना महामंडळ कार्यालयाने वेळोवेळी याबाबत सुचित केलेले आहे. तथापि अद्यापही त्याबाबत पुरेसे अवधान संबंधितांकडून दिले जात नाही.

करीता महामंडळ कार्यालयातील संबंधित सर्व माहिती अधिकारी तथा कार्यासन प्रमुख यांनी माहिती अधिकार अधिनियम-2005 या कायद्यातील तरतुदीच्या मर्यादेत अभ्यासपूर्वक प्राप्त होणाऱ्या माहिती अधिकार अर्जांचा निपटारा करावा.

**स्थळप्रत : अपिलीय अधिकारी यांचे स्वाक्षरीत**

**जन माहिती अधिकारी**
**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे**
**विकास महामंडळ, औरंगाबाद**

जा.क्र. जसंक/2127 दिनांक 15-03-2018

**प्रत :**

जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी-2, गो.म.पा.वि.म., औरंगाबाद
महामंडळ कार्यालयातील सर्व माहिती अधिकारी तथा कार्यासन प्रमुख
परिपत्रक संचिका/नोटीस बोर्ड.